# वसई पोलीस ठाणे कार्यालय,

## (मिरा-भाईदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय)

कार्यालयाचा पत्ता- वसई किल्ला रोड, वसई तहसील ऑफीस जवळ,
ता.वसई, जिल्हा - पालघर, दुरध्वनी - ०२५०- २३२२१८८(कार्यालय)
**Email ID- pi.vasai.mb-vv@mahapolice.gov.in**


जा.क्र.       /२०२१                                                                 दि. २६/०६/२०२१

## प्रेसनोट

## पेटीएमच्या माध्यमातुन बील भरल्याचे भासवुन हॉटेल व्यवसायीकांची फसवणुक करणा-या जोडप्याला अटक

वसई पोलीस ठाणे हद्दीत दि.२५/०६/२०२१ रोजी रात्री ०९.०० वा.चे सुमारास फिर्यादी हिमांशु हरेंद्रसिंग पनौरा वय २८ वर्षे व्यवसाय रेस्टॉरन्ट मालक रा. रु नं १११ ते ११४, पहीला मजला, पाम इन्फ्रास्ट्रक्चर बिल्डींगच्या बाजुला, वसई डेपो, ता- वसई, जि. पालघर यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवुन त्यांच्या द पोस्ट ऑफीस या रेस्टॉरन्टमध्ये एक मुलगा वय अंदाजे २१ वर्षे व त्याच्यासोबत एक मुलगी वय २१ वर्षे असे दोघेजण दिं २३/०६/२१ रोजी येवुन दुपारी २ ते ४ यावेळेत आले. त्यांनी हॉटेलमध्ये ड्रिंक व जेवन केले व त्याचे एकुण बील ६४१६/- रुपये हे पेटीएमच्या माध्यमातुन भरतो असे सांगुन सदर मुलाने त्याच्या मोबाईलवर पेटीएम या बनावट ॲपवर बिल भरल्याचा बनावट मेसेज फिर्यादी यांना दाखविला व पेटीएमचे पेमेंट आल्याचा मेल येण्यापुर्वी सदर आरोपीत हे पसार झाले. हॉटेल मालकाला पेटीएमद्रवारे कोणतेही पेमेंट आले नसल्याने त्यांची फसवणुक झाल्याचे त्यांच्या लक्षात आहे. तरी सदर फिर्यादी यांनी वसई तसेच नालासोपारा परीसरातील इतर हॉटेल मालकांना याबाबत विचारणा केली असता अशाचप्रकारे फसवणुक वसई रिपब्लीक हॉटेल, वसई व द फार्म हॉटेल, नालासोपारा येथे सदर इसमांनी केली असल्याचे फिर्यादी यांना समजले. सदरबाबत फिर्यादी हे पोलीस ठाणेस तक्रार देण्यासाठी आले असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करुन वसई पोलीस ठाणे गु.र.क्रं २५२/२१ कलम ४२०,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांर्भीर्य लक्षात घेवुन व मा.पोलीस उप -आयुक्त (परिमंडळ-२) श्री.संजयकुमार पाटील सो, यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे स.पो.नि. पवार व त्यांचे अधिनस्त स्टाफ यांनी पुढील तपास सुरु केला. तपासामध्ये तांत्रीक माहीती प्राप्त करुन व त्याचे कौशल्यपुर्ण विश्लेषण करुन सदर दोनही आरोपीत १) करीना जगदीश सोलंकी, २१ वर्षे, रा. अलकापुरी, नालासोपारा, पालघर २) आदर्श प्रशांत राय, २१ वर्षे, रा. संखेश्वर, नालासोपारा, पालघर यांना ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. **सदरचा गुन्हा हा तीन ते चार तासात उघडकीस आणला आहे.**

तपासादरम्यान सदर दोन्ही आरोपीतांनी अशाचप्रकारे नालासोपारा येथे देखिल हॉटेलमध्ये फसवणुक केलेबाबत निष्पन्न झाले आहे, सदर प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाणे येथे गु.र.क्रं. २९२/२१ कलम ४२०,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद आहे. तसेच वसई पोलीस ठाणे हद्दित देखिल हॉटेल वसई रिपब्लीक हॉटेल, फार्म हाउस, नालासोपारा येथे देखिल सदर आरोपीतांनी अशाचप्रकारे फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच वसई विरार, नालासोपारा परीसरात सदर आरोपीतांनी अशाचप्रकारे इतर हॉटेल व रेस्टॉरन्ट तसेच पेट्रोल पंप, पब येथे देखिल अशाचप्रकारे फसवणुक करुन गुन्हा केला असल्याची दाट शक्यता आहे.

वरील कामगिरी मा.पोलीस उप -आयुक्त (परिमंडळ-२) श्री.संजयकुमार पाटील, व मा.सहा.पोलीस आयुक्त श्री प्रदीप गिरीधर, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कल्याणराव कर्पे, सहा. पोलीस निरीक्षक सुनिल पवार, स.फौ भगीरथ, पो.ना १३५६/ विक्रम पन्हाळकर, म.पो.शि./५१२ कोकरे, पो.शि/७२२ अमोल बर्डे यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner